# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**महत्वाचे / कालमर्यादीत.**

क्र.संगाबाअवि/१/१०२/ई-१९(बी)/ २-२०८/२०१२
दिनांक : २९ फेब्रुवारी, २०१२

प्रति,

प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील कर्मचा-यांचा गौरव.**

संदर्भ : नियम क्र. ३/२०१० व दुरूस्तीचा नियम क्र. १/२०१२ ( विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा उत्कृष्ठ सेवेबद्दल गौरव व सत्कार करण्याबाबातचे नियम )

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेले संदर्भांकित नियम क्र. ३/२०१० व दुरूस्तीचे नियम १/२०१२ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरील नियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध असून त्यानुसार महाविद्यालयीन प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा, त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा विद्यापीठाच्या वर्धापन दिनी (१ मे, २०१२) गौरव करावयाचा आहे. गौरवाकरिता खालीलप्रमाणे कर्मचा-यांचे गट करण्यात आले आहेत.

**महाविद्यालय :** अ) सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक
ब) सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक
क) सर्व संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी.

महाविद्यालय आस्थापनेत सलग ५ वर्षे सेवा झालेल्या प्राचार्य/शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांना उपरोक्त ३ गटांमधुन प्रत्येकी १ याप्रमाणे खालील स्वरूपाचे पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र २) शाल व श्रीफळ ३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणा-या संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून (www.sgbau.ac.in) विहीत प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह ४ संचामध्ये महाविद्यालयांच्या प्राचार्य/संचालक/संस्थाप्रमुखांकडे सादर करावा.

संबंधीतांनी नियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणा-या तथा गौरवाकरीता पात्र वाटणा-या गटनिहाय फक्त एका प्राचार्य/संचालक/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे अर्ज आवश्यक सहपत्र तथा अभिप्रायासह ४ संचामध्ये गोपनियरित्या, मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे दि. १ मार्च २०१२ ते ३१ मार्च २०१२** या कालावधीत पाठवावयाचे आहेत. नियमाप्रमाणे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम तिथी दि. ३१ मार्च २०१२ ही असल्यामुळे डाकेने पाठविण्यात येणारे प्रस्ताव दि. ३१ मार्च २०१२ किंवा तत्पुर्वी विद्यापीठाकडे पोहोचतील या बेताने पाठविण्यात यावेत. महाविद्यालयीन प्राचार्य यांचे संदर्भात संबंधीत संस्था चालकांनी तसेच शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे संदर्भात प्राचार्यांनी / संस्था प्रमुखांनी त्यांचे अभिप्राय तथा शिफारस नोदवून संबंधीत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे अर्ज त्यांच्या मागील सलग ५ वर्षाच्या विहीत नमुन्यातील गोपनीय अहवालाच्या छायाचित्रीत प्रमाणित प्रतींसह ४ संचामध्ये विद्यापीठास पाठवावयाचे आहेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**याशिवाय सदर प्रयोजनार्थ तयार करण्यात आलेल्या नियमातील मुद्दा क्र. ७ नुसार नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संदर्भात महाविद्यालयाचे / संस्थेचे प्रस्ताव असल्यास ते सुद्धा उपरोक्त विहीत मुदतीत विद्यापीठास सादर करण्यात यावेत.**

**संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध असलेला विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त करून महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक/संस्थाचालकांकडे आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह सादर करावा. व संबंधितांनी सादर केलेले अर्ज, नियंत्रण अधिका-यांनी त्यांचे अभिप्राय तथा शिफारशीसह विद्यापीठ कार्यालयास दि. १ ते ३१ मार्च या कालावधीत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमासंदर्भात प्रस्ताव असल्यास तेही विहीत मुदतीत सादर करावेत. दि. ३१ मार्च नंतर विद्यापीठास प्राप्त होणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.**

वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत प्राचार्य/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

नियम क्र. ३ /२०१०

### विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबातचे नियम

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यापीठाला दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा गौरव करावयाचा निर्णय घेतलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रयोजनार्थ नियम तयार करण्यात येत आहे.

१) हे नियम " विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा गौरव व सत्कार करण्याबाबतचे नियम - ३/२०१०" म्हणून संबोधण्यात येईल.

२) हे नियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केल्याचे दिनांकापासून अस्तित्वात येतील.

३) **व्याख्या -**

**अ)** या नियमातील " विद्यापीठ, महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख, विद्यापीठ शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी, संलग्न महाविद्यालय, स्वायत्त महाविद्यालय, मान्यता प्राप्त संस्था " म्हणजे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, परिनियम,अध्यादेश व महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता १९८४ यामध्ये नमुद केलेल्या परिभाषा.

**ब)** " समिती "म्हणजे सदर नियमांतर्गत द्यावयाच्या पुरस्कारासाठी पात्र असलेल्यांची निवड करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेद्वारा मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती.

**क)** "गौरव" म्हणजे विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य / शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर नियमांतर्गत द्यावयाचा पुरस्कार

४) **सदर प्रयोजनार्थ मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती खालीलप्रमाणे असेल.**

| | | |
|---|---|---|
| १) मा. कुलगुरू | .... | अध्यक्ष |
| २) व्यवस्थापन परिषदेने नामित केलेले व्य. प. चे दोन सदस्य | .... | सदस्य |
| ३) कुलसचिव | .... | सचिव |

५) **पुरस्काराची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील.**

**अ) विद्यापीठ स्तर -**

| | | |
|---|---|---|
| (अ) शिक्षक | - | एक |
| (ब) अधिकारी (प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी) | - | एक |
| (क) तृतीय श्रेणी कर्मचारी | - | एक |
| (ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | एक |

**ब) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था स्तर**

| | | |
|---|---|---|
| (अ) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक | - | एक |
| (ब) संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक | - | एक |
| (क) संलग्न महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी | - | एक |

६) **गौरव पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील.**

(अ) प्रमाणपत्र ( परिशिष्ट - ड )

(ब) शाल व श्रीफळ

(क) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक, ज्यावर एका बाजूने विद्यापीठाचे मोनोग्राम व दुसऱ्या बाजूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन - गौरवप्राप्त प्राचार्य /शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांचे नाव, १ मे ----- असे नमूद केलेले असेल. (परिशिष्ट - इ )

७) **समितीला योग्य वाटल्यास संलग्नित महाविद्यालय, स्वायत्त संस्था यामध्ये राबविण्यात येणा-या नाविण्यपुर्ण उपक्रमाबद्दल (Innovative Practices) एका महाविद्यालयाला प्रशस्ती पत्र देऊन गौरवान्वित करण्यात येईल.**

८) **मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली दरवर्षी १ मे रोजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी ध्वजारोहणानंतर विशेष कार्यक्रमात गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतील.**

९) **गौरवानिमित्त पारितोषिक / प्रशस्तीपत्र प्राप्त करणा-या व्यक्तीस खालील अधिकारी पुरस्कारक राहतील.**

| | | |
|---|---|---|
| अ) प्राचार्य / संचालक | - | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ |
| ब) शिक्षक | - | संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता |
| क) अधिकारी | - | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ |
| ड) तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी | - | कुलसचिव |
| इ) महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था | - | संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ |

१०) **गौरवासाठी निवड करतांना खालील निकष विचारात घेण्यात येतील.**

**अ) प्राचार्य / शिक्षकांकरीता -**

i) विद्यापीठात/ महाविद्यालयात सलग किमान ५ वर्षे सेवा
ii) महाविद्यालयातील / वर्गातील उपस्थितीचे प्रमाण
iii) वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्याची शैली
iv) विषयासंबंधीच्या परिषदामधील सहभाग
v) शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग (संपादक, प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग)
vi) प्रकाशित झालेले शोधनिबंध ( ISSN, MPSIR, ICCSR, दर्जा प्राप्त शोधपत्रिका )
vii) प्रकाशित झालेले पुस्तके ( ISBN No. प्राप्त )
viii) आंतरराष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
ix) राष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
x) राज्यस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
xi) विद्यापीठाच्या कार्यक्रमात, उपक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्ष घेतलेला सहभाग.
xii) विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध
xiii) विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीवरील निवड / नियुक्ती.
xiv) विभागाच्या विकासात्मक कामातील रूची
xv) महाविद्यालयात संचालित होणा-या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभाग
xvi) महाविद्यालयात नॅकचे मानांकन मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न
xvii) मागील सलग पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाचा दर्जा.
xviii) इतर

**ब) अधिकारी / कर्मचा-यांकरीता -**

i) विद्यापीठात सलग किमान ५ वर्षे सेवा
ii) कार्यालयातील उपस्थितीची नियमितता
iii) शैक्षणिक पात्रता
iv) कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा
v) वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण
vi) कार्यालयीन कामकाजात उत्स्फूर्त पुढाकार
vii) गोपनीय दर्जाचे काम / महत्वाचे दस्तऐवज सांभाळण्याची क्षमता
viii) वरिष्ठांशी, सहका-यांशी व जनतेशी संबंध
ix) विश्वसनियता
x) ज्ञानस्तर
xi) कार्यालयीन काम पूर्ण करण्याची रूची
xii) अधिनस्त कर्मचा-यांकडून काम करवून घेण्याचे कौशल्य
xiii) मागील सलग पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाचा दर्जा.
xiv) इतर

**११) पुरस्कारासाठी अर्ज करण्याची पद्धती.**

**अ)** संलग्नित महाविद्यालये / प्राचार्य / शिक्षक / अधिकारी / शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये दरवर्षी दिनांक १ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावा लागेल. उपरोक्त अर्जाचा नमुना नियम क्र. ३/ २०१० सह विद्यापीठाच्या संकेत स्थळावर व कार्यालयात उपलब्ध राहील. विद्यापीठाच्या संकेत स्थळावरून विहीत नमुना उपलब्ध करून घेऊन (Down Load) अर्ज सादर करावयाचा आहे. यासाठी विद्यापीठाकडून वेगळी अधिसूचना किंवा परिपत्रक काढण्यात येणार नाही.

**ब) विविध वर्गवारीसाठी वापरावयाचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य | - परिशिष्ट - अ |
| २) | विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षक | - परिशिष्ट - ब (प्रपत्रांसह) |
| ३) | अधिकारी / कर्मचारी | - परिशिष्ट - क |

**क) विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही.**

विभाग प्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी गौरवाकरिता निवड करण्यासाठी आपल्या नियंत्रणाअंतर्गत कर्तव्यस्त असलेल्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्त प्रपत्रांची छाननी करून प्रस्तुत गौरवाकरिता पात्र ठरू शकणाऱ्या गटनिहाय एक प्राचार्य / शिक्षक / अधिकारी / कर्मचारी (तृतीय श्रेणी मधून एक व चतुर्थ श्रेणी मधून एक) चे नाव अभिप्रायासह सुचवतील. सदर प्रपत्र अभिप्रायासह चार प्रतीत गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात कुलसचिवांचे नावे सादर करतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अभिप्राय विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**१२)** सदर नियमांतर्गत गौरवासाठी निवड करण्याकरीता गठीत केलेल्या समितीच्या शिफारसी स्वीकृत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना राहतील. तथापि, मा. कुलगुरूंनी प्रदान केलेल्या पुरस्कारांची माहिती व्यवस्थापन परिषदेला माहितीकरीता तातडीने सादर करण्यात येईल. तसेच सदरील माहिती विद्यापीठाच्या राजपत्रात तसेच वार्षिक अहवालामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल.

**१३)** सदर उपक्रमाकरीता अपेक्षित खर्चाची तरतूद दरवर्षी अंदाजपत्रकात करण्यात येईल.

**१४)** गौरव पुरस्कार मिळण्यासाठी ज्या व्यक्तींनी विहीत पद्धतीनुसार अर्ज केलेला नसेल व अशा व्यक्ती पुरस्कारास पात्र ठरू शकतात, असे समितीच्या प्रथमदर्शनी लक्षात आल्यास अशा व्यक्तींचा अर्ज समितीच्या सभेच्या आठ दिवस आधी त्यांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांकडून मागविण्यात यावा व विचारार्थ समितीसमोर ठेवण्यात यावा.

(परिशिष्ट- अ )

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महाविद्यालयीन प्राचार्य/ संचालक यांचा गौरव करतांना गौरव समिती समोर सादर करावयाची खालील माहिती इच्छुकांनी स्वतः भरुन संस्थेच्या सचिव /अध्यक्षांमार्फत सादर करावी.

प्राचार्यांचे नांव : ______________________________________________

महाविद्यालयाचे नाव : ____________________________ प्रथम नियुक्ती दिनांक _________

1. प्राचार्य/संचालक म्हणून सलग 5 वर्ष सेवा झालेली आहे काय?:-----------------------------------
2. महाविद्यालयातील उपस्थितीचे प्रमाण : -----------------------------------------
3. प्राचार्य/संचालक शिकवित असलेल्या विषयाचे नाव : -----------------------------------------
4. महाविद्यालयात संचालित होणाऱ्या अभ्यासपुरक व अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग : -----------------------------------------
   -----------------------------------------
5. वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्याची शैली : -----------------------------------------
6. विषयासंबंधीच्या परिषदांमधील सहभाग : -----------------------------------------
7. प्रकाशित झालेले शोधनिबंध ISSN असलेल्या शोधपत्रिकेत. : -----------------------------------------
   -----------------------------------------
8. प्रकाशित साहित्य / पुस्तके ISBN प्राप्त. : -----------------------------------------
9. आंतरराष्ट्रीयस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध: -----------------------------------------
10 राष्ट्रीयस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध : -----------------------------------------
11. राज्यस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध : -----------------------------------------
12. विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध : -----------------------------------------
13. विभागाच्या विकासात्मक कामातील रूची : -----------------------------------------
   -----------------------------------------
14. विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग. : -----------------------------------------
   -----------------------------------------
15. महाविद्यालयात नॅकचे मानांकन मिळाले आहे काय? मिळाले असल्यास ग्रेड नमुद करावा. -----------------------------------------
   -----------------------------------------
16. प्रशासकीय कामात सहभाग : -----------------------------------------
   -----------------------------------------
17. इतर : -----------------------------------------
   -----------------------------------------

_______________________________

स्थळ - स्वाक्षरी

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

## संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय

(टिप : प्राचार्यांचे सलग 5 वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय

स्थळ : अध्यक्ष / सचिवांची

दिनांक : स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :- ---------------------------------------------------------------------------------

## कार्यालयीन उपयोगाकरिता

### अहवालातील निरिक्षण

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**(परिशिष्ट- ब)**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील/महाविद्यालयातील शिक्षकांचा गौरव करतांना गौरव समिती समोर सादर करावयाची खालील माहिती इच्छुकांनी स्वतः भरुन विभाग प्रमुखाकडे/प्राचार्याकडे सादर करावी.

शिक्षकाचे नांव : ____________________________________________

पदनाम : ____________________ विभाग __________________ प्रथम नियुक्ती दिनांक ___________

1) विद्यापीठात/ महाविद्यालयात सलग ५ वर्षे सेवा झालेली असणे. ------------------------------------------

2) महाविद्यालयातील / वर्गातील उपस्थितीचे प्रमाणे ------------------------------------------

3) वर्गात विद्यार्थ्यांना शिकविण्याची शैली ------------------------------------------

4) विषयासंबंधीच्या परिषदामधील सहभाग ------------------------------------------

5) शोधपत्रिका प्रकाशनात असलेला सहभाग (संपादक,- प्रकाशक, सल्लागार, परीक्षक म्हणून सहभाग) ------------------------------------------

6) प्रकाशित झालेले शोधनिबंध ( ISSN, MPSIR, ICCSR, दर्जा प्राप्त शोधपत्रिका ) ------------------------------------------

7) प्रकाशित झालेले पुस्तके ( ISBN No. प्राप्त ) ------------------------------------------

8) आंतरराष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध ------------------------------------------

9) राष्ट्रीय स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध ------------------------------------------

10) राज्यस्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध ------------------------------------------

11) विद्यापीठाच्या कार्यक्रमात, उपक्रमात, प्रकल्पात प्रत्यक्ष घेतलेला सहभाग. ------------------------------------------

12) विद्यापीठ स्तरावर वाचण्यात आलेले शोधनिबंध ------------------------------------------

13) विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणीवरील निवड/नियुक्ती. ------------------------------------------

14) विभागाच्या विकासात्मक कामातील रूची ------------------------------------------

15) महाविद्यालयात संचालित होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभाग ------------------------------------------

16) महाविद्यालयात नॅकचे मानांकन मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न ------------------------------------------

17) इतर ------------------------------------------

______________________________

स्वाक्षरी

स्थळ -

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

## विभाग प्रमुख / प्राचार्यांचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ /महाविद्यालयातील शिक्षकांचे संदर्भात संबंधित शिक्षकाचे सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय देण्यात यावा. तसेच महाविद्यालयातील शिक्षकांचे संदर्भात मागील सलग ५ वर्षे सेवेसंदर्भातील गोपनिय अहवालाचे अंश नमूद करून तत्संबंधी अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्यात याव्यात.)

स्थळ : प्राचार्य / विभाग प्रमुखांची
दिनांक : स्वाक्षरी व शिक्का

## कार्यालयीन उपयोगाकरिता

### गोपनिय अहवालातील निरिक्षण

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी या प्रपत्रात माहिती भरून हे प्रपत्र परिशिष्ट-ब सोबत जोडावयाचे आहे.

## Academic Performance Indicators (API) & Weightage Points(WP)

| Quality Indicator | Faculties of Science/ Engineering/ Arts/ Social Sciences/ Education/ Law/ Commerce/ Medicine | Score out of | Total score obtained |
|---|---|---|---|
| **TEACHING& CONTRIBUTION TO PROFESSIONAL RELATED ACTIVITIES** | | | |
| **TEACHING** | • Allocation of teaching classes and actual number of classes taught.<br>( 75% and above )<br>( 50% to 75% )<br>( below 50% ) | 20 Points<br>10 Points<br>00 Points | |
| | • Developing Innovative Teaching Methods /CDs/ ICT materials/Teaching-Learning modules for participatory process. | 5 Each | |
| | • Developing new curricula and teaching new Courses. | 5 Each | |
| | • Production of relevant teaching material including prescribable text books. | 5 Each | |
| | • Development and participation in external/internal examination work of the College/ University. | 1 Each | |
| PROFESSION RELATED CTIVITIES | • Membership in Boards of Studies; | 20 | |
| | • Nomination to Higher Education related committees; | ( 05 for each ) | |
| | • Contribution to profession related activities in other higher education institutions; | ( 05 for each ) | |
| RESEARCH AND DEVELOPMENT RELATED ACTIVITIES : | | | |
| Research Publication (Journals) | Refereed Journals with impact factor 1.0 or above | 10 points/ publication | |
| | Refereed Journals with impact factor less than one indexed | 5 points / publication | |
| | (a) National level research papers in non-refereed journals but having ISBN/ISSN numbers.<br>(b) Full papers in conference proceedings, etc. (Abstracts not to be included) | (a) 3 points/ publication<br>(b) 2 points / publication | |
| Research Publications (books, chapters in books, other than refereed journal articles) | Books Published by International Publishers | 20 points/sole author, and 10 points/ edited chapter books. | |
| | Indian/National level publishers/State and Central Govt. Publications with ISBN/ISSN numbers | 10 points/sole author, and 5/ edited chapter books | |
| | Other local publishers with ISBN/ISSN numbers | 5 points/ sole author, and 2 points/ edited chapter books | |
| | Chapters contributed to edited volumes published by International Publishers | 5 points /Chapter | |
| | Chapters in Indian/National level reputed publisher with ISBN/ISSN numbers | 3 points / Chapter | |
| **RESEARCH PROJECTS** | | | |
| Sponsored Projects carried out/ongoing through the institution | (a) Major Projects<br>(b) Minor Projects | 10 Points for each major project<br>5 points for each minor project | |
| Consultancy Projects | Amount mobilized with minimum of Rs.5.00 lac | 10 points per every Rs.5.0 lac and Rs.1.0 lac, respectively | |

| | | | |
|---|---|---|---|
| Completed projects : Quality Evaluation | Completed project Report (Acceptance report "satisfactory" from funding agencies to be produced) | 20 points/each major project and 10 points / each minor project | |
| Projects Outcome / Outputs | Patent/Technology transfer/ Product/Process | 25 points / each output or outcome | |
| **RESEARCH GUIDANCE** | | | |
| M.Phil. | Degree awarded only | 3 points /each candidate | |
| Ph.D | Degree awarded /thesis submitted | 10 points /each candidate | |
| REFRESHER COURSE/CONFERENCE /SEMINAR/WORKSHOP PARTICIPATION & ORGANIZATION | | | |
| Orientation / Refresher Course/ Research Methodology/ Workshops | Orientation / Refresher Courses organized by the Academic Staff College /Research Methodology course as Coordinator (not less than 21 days)/ Workshops of not less than one week duration as Organizing Secretary. | 20 points | |
| Faculty participation in Conferences/ Seminars/ Workshops etc. | Participation and Presentation of research papers in : | Points / | |
| | (a) International / foreign conference | 10 points/each | |
| | (b) Indian/National Level Conference | 5 points / each | |
| | (c) Regional Conferences & others | 2 points / each | |
| Conferences /Seminars/Workshops / Symposia Organized | (a) International<br>(b) National<br>(c) Regional/Local<br>(d) Endowment Lectures/Invited Lectures | (a) 15 Points /each<br>(b) 10 Points /each<br>(c) 5 Points /each<br>(d) 2 Points /each | |
| **AWARDS / HONOURS / RECOGNITIONS** | | | |
| | (a) International<br>(b) National<br>(c) State Level<br>(d) Local | (a) 50 points /each<br>(b) 25 points/each<br>(c) 10 points/each<br>(d) 5 points/each | |
| EXTENSION, CO-CURRICULAR WORK & STUDENT MENTORING ACTIVITIES : | | | |
| | i. Organization /active participation in students/ Staff related socio-cultural programs.<br>ii. Community service and social orientation programs thro' NSS/NCC/ NGO/ NSO etc.<br>iii. Sports activities/ camps/ tournaments/ competitions. etc.<br>iv. Library orientation /ICT usage promotion activities in libraries among students<br>v. Institutional cocurricular/ extra curricular activities. | 10 Points each<br>10 Points each<br>10 Points each<br>10 Points each<br>10 Points each | |
| | **Total Score** | | |

Signature of Teacher

Date :

Signature of Principal

# Undertaking

I hereby undertake that the information furnished above is based on facts. In case it is found that the information is false or incorrect, I shall be liable for disciplinary action.

Signature of Applicant

# Verification

Verified at --------------------------- on ------------------ day of 20 ______ that the information furnished above is correct to the best of my knowledge and nothing has been concealed.

Principal

(परिशिष्ट- क)

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील / संलग्न महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव करण्यासाठी गौरव समिती समोर सादर करावयाची खालील माहिती इच्छुकांनी स्वतः भरुन नियंत्रण अधिका-याकडे/प्राचार्याकडे सादर करावी.

अधिकारी/कर्मचा-यांचे नांव : ______________________________________________________

विद्यापीठ / महाविद्यालयाचे नांव : ___________________________________________

पदनाम : ____________________ विभाग ____________________ प्रथम नियुक्ती दिनांक _________

1. शैक्षणिक पात्रता : ------------------------------------------
2. सलग 5 वर्ष सेवा झालेली आहे काय? : ------------------------------------------
3. कार्यालयातील उपस्थितीची नियमितता. : ------------------------------------------
4. कार्यालयीन कामकाजातील वक्तशिरपणा. : ------------------------------------------
5. वर्षभरातील घेतलेल्या सुटीचे प्रमाण : ------------------------------------------
6. कार्यालयीन कामकाजात उत्स्फूर्त पुढाकार : ------------------------------------------
7. कार्यालयीन कामकाजात सुलभता आणण्यासाठी केलेले प्रयत्न व त्यातील यशापयश : ------------------------------------------ ------------------------------------------
8. गोपनीय दर्जाचे काम/कागदपत्रे सांभाळण्याची क्षमता. : ------------------------------------------
9. कामकाजाचा स्तर उंचावण्याकरिता केलेले उल्लेखनीय प्रयत्न व योगदान : ------------------------------------------ ------------------------------------------
10. वरिष्ठांशी,सहका-यांशी व जनतेचे संबंध : ------------------------------------------
11. कार्यालयीन कामाबाबत कर्मचा-यांमध्ये बांधीलकीची जाणीव निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न : ------------------------------------------ ------------------------------------------
12. विश्वसनीयता : ------------------------------------------
13. कार्यालयीन कामात सहका-यांना केलेल्या मदतीचे स्वरुप. : ------------------------------------------ ------------------------------------------
14. कार्यालयीन काम करण्याची रुची : ------------------------------------------
15. निर्णयक्षमता : ------------------------------------------
16. कामातील दूरदर्शीता : ------------------------------------------
17. अधिनस्त कर्मचा-यांकडून काम करवून घेण्याचे कौशल्य : ------------------------------------------
18. ज्ञानस्तर. : ------------------------------------------

19 विद्यापीठ/महाविद्यालयात नॅकचे मानांकन मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न. : -------------------------------------- --------------------------------------

19\. इतर : ------------------------------------------

__________________________________________

स्वाक्षरी

स्थळ -

दिनांक -

*टिप : आवश्यक तेथे पुरावे सादर करावे. आवश्यकता भासल्यास पुरवणी कागद वापरता येईल.*

## प्राचार्य / नियंत्रण अधिका-याचे अभिप्राय

(टिप : विद्यापीठ /महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे संदर्भात संबंधित अधिकारी/ कर्मचा-यांचे सलग ५ वर्षाचे सेवेबाबतचा अभिप्राय) महाविद्यालयासंदर्भात त्यांच्या प्राचार्यांनी संबंधितांच्या मागील सलग ५ वर्षाच्या गोपनिय अहवालाचे अंश नमूद करून तत्संबंधित अहवालाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडण्यात याव्यात.)

स्थळ : प्राचार्य / नियंत्रण अधिका-याची

दिनांक : स्वाक्षरी व शिक्का

## कार्यालयीन उपयोगाकरिता

### अहवालातील निरिक्षण

कुलसचिव,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

परिशिष्ट "ड "

# संत गाडगे बाबा

# अमरावती विद्यापीठ

## उत्कृष्ट सेवा गौरव

---

डॉ./श्री./श्रीमती ----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

आपण आपल्या आजपर्यंतच्या सेवाकालात विद्यापीठाला उल्लेखनीय सेवा दिली. आपण दिलेल्या उत्कृष्ट सेवा विद्यापीठाच्या विकासात व प्रतिष्ठेत भर घालणाऱ्या आहेत. आपल्या या प्रशंसनीय सेवेबद्दल हे गौरव प्रमाणपत्र आपणास प्रदान करण्यात येत आहे.

दि.१ मे २०                                        कुलगुरू

परिशिष्ट " इ "

# पदकाचा नमुना

एक बाजु

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ वर्धापन दिन

उत्कृष्ट सेवा

गौरव प्राप्त ---------------- *

१ मे, २०१

दुसरी बाजु

* -- अधिकारी

* -- प्राचार्य

* -- शिक्षक

* -- शिक्षकेत्तर कर्मचारी